महा मेट्रो

PUNE METRO

## महामेट्रोतर्फे शाळेतील मुलांसाठी वाहतुकीच्या नियमनाबाबत बाल शिक्षण मंदिर शाळेत व्याख्यान आयोजित

पुणे , ८ ऑगस्ट २०१८ : महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन तर्फे पुण्यातील वाहतुकीच्या नियमनाबाबत महाराष्ट्र एजुकेशन सोसायटीच्या बाल शिक्षण मंदिर या शाळेत व्याख्यान आयोजित केले होते . महामेट्रोच्या दोन मार्गिकांचे काम सध्या वेगाने सुरु आहे . मार्गिका क्रमांक १ हा पीसीएमसी ते स्वारगेट आणि मार्गिका क्रमांक २ हा वनाज ते रामवाडी असा आहे . वनाज ते रामवाडी या मार्गिकेमध्ये एकूण १६ स्टेशन आहेत . तसेच ही सर्व स्थानके उन्नत आहेत. या मार्गावर मेट्रोचे काम करत असताना रस्त्यावर नागरिकांना वाहतुकीचा त्रास होऊ नये म्हणून महामेट्रोतर्फे अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत . या कार्यक्रमास बाल शिक्षण मंदिर शाळेच्या प्राचार्य जयश्री बोधनकर , महामेट्रोचे आणि जलद कृती दलाचे शरद जांभळे, मिलिंद ठोसर आणि जलद कृती दल इत्यादी उपस्थित होते .

महामेट्रो शाळेतील मुलांच्या सुरक्षेसाठी जागरूक आहे . तसेच मेट्रोतर्फे मुलांनी वाहतूक करताना जी सुरक्षा घेतली पाहिजे त्यावर व्याख्यानांची मालिका करणार आहे . त्यातील बाल शिक्षण मंदिर शाळेतील हे पहिले व्याख्यान आहे . मेट्रोची ज्या ठिकाणी अलाईनमेंट आहे त्यामधील शाळांमध्ये जाऊन वाहतुकीच्या नियमनाबाबत जागृती निर्माण करणार आहे . आणि त्यांच्यासाठी यापुढे अनेक व्याख्यान आयोजित केले जाणार आहेत . शाळेतील मुलांनी मेट्रोचे जे बॅरिकेड आहेत त्यांच्या बाजूनेच / कडेनेच वाहतूक करावी . आवश्यक नसल्यास मेट्रोचे जिथे काम चालू आहे त्या विभागातून वाहतूक करू नये . तसेच जास्तीत जास्त सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करावा . असेही महामेट्रोकडून सांगण्यात आले आहे .

यामध्ये मुलांना मार्गदर्शन करताना , मुलांनी नशा करून वाहन चालवल्यास दंड होतो . तसेच त्यांचा वाहन चालवण्याचा परवानाही रद्द होऊ शकतो . वाहन चालवताना रस्त्याच्या स्तिथीकडे लक्ष दिले पाहिजे . उदा . रस्ता वळणाचा असेल तर वाहन हळू चालवावे . वाहनाचा मैंटेन्स, दुरुस्ती नियमित केली पाहिजे. रस्त्याने वाहन चालवताना इतर वाहनांच्या वेगाकडे , दिशेकडे लक्ष दिले पाहिजे . अश्या महत्वपूर्ण सूचना सांगितल्या .

या  व्यख्यानाला शाळेतील मुलांनी उस्फुर्त प्रतिसाद तर दिलाच . तसेच अनेक मुलांनी मेट्रोच्या अधिकाऱ्यांना प्रश्न आणि शंका विचारल्या . त्यावर मेट्रोच्या  अधिकाऱ्यांनी त्यांच्या शंकाचे  निरसन केले . या व्याख्यानांमध्ये मुलांना वाहतुकीचे नियम , कोणत्या वयोगटातील मुलांनी  वाहन चालवले पाहिजे . ट्रॅफिक सिग्नल मधील कोणता रंग कशासाठी असतो  ते समजावून सांगितले .रस्त्यावर  अपघात झाल्यास मेट्रोच्या जलद कृती दलाला त्वरित संपर्क साधावा असेही आवाहन यावेळी करण्यात आले  आहे .

पुणे मेट्रोचे काम रस्त्याच्या मधून करावयाचे आहे . रस्त्याच्या मध्यभागी काम चालू ठेवून उरलेल्या भागातून वाहतूक सुरु राहणार आहे . यासाठी पुणे मेट्रोकडून पुढील यंत्रणा निर्माण केली आहे . या कामासाठी चार मार्गिका करण्यात आल्या असून मार्गिकेमध्ये  १ सेवा निवृत्त एसीपी  वाहतूक नियंत्रणासाठी प्रमुख नेमण्यात आले आहे . एसीपी  यांच्या सहायासाठी ३ सेवा निवृत्त पोलीस अधिकारी नेमले आहेत . या

अधिकाऱ्याची कर्तव्य खालीलप्रमाणे आहेत :

१) अपघात किंवा आपत्तीच्या काळात संबंधितांसाठी तात्काळ मदत पुरविणे .

२) पोलीस विभाग आणि सरकारी खात्यांशी समन्वय ठेवून कार्य करणे .

३) मेट्रोच्या कामासाठी वाहतूक बदलाचे डायव्हर्जन प्लॅन तयार करणे आणि त्यांची पोलीस विभागाकडून मंजुरी मिळवणे .

४) ट्रॅफिक डायव्हर्जन करताना मेट्रोचे काम करणाऱ्या काँट्रॅक्टरशी समन्वय ठेवणे .

५) नागरिकांना मेट्रो बाबत पोस्टर , बॅनर , इ. द्वारे  माहिती देणे .

६) मेट्रो मधील अनेक आस्थापनामधून मध्ये संपर्क ठेवून  त्यांच्यातील दुवा म्हणून काम करणे .